# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी — 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

**प्रवेशासंबंधी महत्वाची सूचना**

क्रमांक : २अ/एडीएम/प्रमाणपत्रे/२०१७/ ४१६
दिनांक : 28 APR 2017

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक प्रमाणपत्रे**

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र तसेच प्रथम, फार्म. डी., वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी (Under Graduate ) , प्रथम वर्ष एम.ई./एम.टेक., एम.फार्म., एम.आर्किटेक्चर, एम.एचएमसीटी , एमबीए/एमएमएस हे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम तसेच प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष एमसीए पदव्युत्तर पदवी (Post Graduate) या अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधून प्रवेश करण्यात येतात.त्यासाठी आवश्यक असणारी प्रमाणपत्रे/कागदपत्रांची यादी संचालनालयाने क्रमांक २अ/एडीएम/प्रमाणपत्रे/२०१६/१६०९, दिनांक ८.१२.२०१६ च्या अधिसूचनेद्वारे प्रसिध्द केलेली आहे.

आता केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेला प्रत्यक्ष सुरूवात होणार असल्याने त्यासाठी कागदपत्रे पडताळणीवेळी प्रवेश नियमावलीत नमूद केलेल्या **आवश्यक त्या प्रकरणी लागू पडणारी** खालील प्रमाणपत्रे सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त करून घेऊन ती तयार ठेवण्याबाबत प्रवेशोच्छुक उमेदवारांना याद्वारे पुनश्च सूचित करण्यात येत आहे.

१) जात /जमात प्रमाणपत्र (सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले )
२) जात / जमात वैधता प्रमाणपत्र (सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले )
३) नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र (अनूसूचित जाती/अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उर्वरीत सर्व मागासवर्गीय उमेदवारांसाठी )
४) अधिवास प्रमाणपत्र (प्रवेश नियमावलीत नमूद केलेल्या प्रकरणी आवश्यकतेनुसार )
५) उत्पन्नाचे प्रमाणपत्र (TFWS योजनेअंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले )
६) अपंगत्वाचे प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले )
७) Defence/अल्पसंख्यांक इ. संवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदवारांच्या प्रवेशासाठी विहीत नमुन्यातील प्रमाणपत्रे
**८) आधार क्रमांक व संलग्नित बँक खाते : शिष्यवृत्ती, शुल्क प्रतिपूर्ती इ.योजनांची रक्कम थेट लाभार्थीच्या खात्यात जमा होण्यासाठी आवश्यक**

**इशारा : मागील शैक्षणिक वर्षात काही उमेदवारांनी प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही प्रमाणपत्रे जसे जात / जमात प्रमाणपत्रे / जात वैधता प्रमाणपत्रे /अपंगत्वाचे प्रमाणपत्र / नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्रे ही,सक्षम प्राधिका-याकडून प्राप्त करून न घेता बनावट प्रकारची सादर केल्याचे पडताळणीअंती आढळून आले होते अशा उमेदवारांचा प्रवेश रद्द करून त्यांचेविरूध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. आता प्रवेशोच्छुक उमेदवारांना पुनश्च सूचित करण्यात येते की, त्यांनी सक्षम प्राधिका-याकडून प्रमाणपत्रे प्राप्त करून न घेता बनावट अथवा खोटी प्रमाणपत्रे प्रवेशासाठी सादर केल्याचे आढळल्यास अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द करून त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

वेगवेगळया वर्गवारी अंतर्गत प्रवेशासाठी आवश्यक असणा-या प्रमाणपत्रांची तपशिलवार माहिती प्रवेश नियमात अंतर्भूत असून त्याचा तपशिल www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

( दयानंद मेश्राम )
सहसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

E:\Budage\२०१७-१८\Notifications\required documents for admission April २०१७.docx